# नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक ६०१/२०२० मधील निशाण १३१ वरील आदेश

१. वादी यांनी हा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश १, नियम १० व आदेश ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.५ ते १३, १६ व १७ यांनी या अर्जास निशाण १४४ वर म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. इतर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल केलेले नाही.

३. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे त्यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द हा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. हा दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.१२ यांनी दावा मिळकत गट नं.२६६ ही प्रस्तावित प्रतिवादी क्र.२४ संजय गोपीनाथ सांळुखे यांना दि.०६.०७.२०१८ रोजी खरेदी दिली आहे. त्यामुळे, प्रस्तावित प्रतिवादी क्र.२४ यांना या कामी पक्षकार म्हणून सामील करुन घेणेसाठी व त्यांचे लाभात झालेल्या खरेदीपत्राबाबत दाव्यामध्ये योग्य तो मजकूर नमूद करणेसाठी वादी यांनी या अर्जान्वये दावा दुरुस्तीची मागणी केली आहे. वर नमूद प्रतिवादी यांनी अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, वादी यांनी अर्जाचे पृष्ट्यर्थ ॲफेडेव्हीट सादर करुन अर्जातील कथने शपथेवर कथन केली आहेत. प्रतिवादी यांनी देखील त्यांचे म्हणण्यामध्ये संजय गोपीनाथ सांळुखे यांना दावा मिळकत विक्री केल्याची बाब मान्य केली आहे. निशाण १३०, अ.क्र. १ वरील दावा मिळकत गट नं.२६६ चा सातबारा उतारा व निशाण १३०, अ.क्र.२ वरील खरेदीपत्र पाहता प्रतिवादी क्र.१२ यांनी हा दावा प्रलंबित असताना प्रस्तावित प्रतिवादी क्र.२४ संजय गोपीनाथ साळुंखे यांना दि.०६.०७.२०१८ रोजी दावा मिळकत

गट नं.२६६ विक्री केल्याचे दिसून येते. त्यामुळे, वादी यांनी त्यांच्या अर्जामध्ये जी कथने केली आहेत, त्या कथनांमध्ये तथ्य दिसून येते. वादी यांनी या दाव्याचे कामी वादी क्र.१ यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. परंतु, वादी क्र.१ यांचा अदयाप उलटतपास सुरु झालेला नाही. त्यामुळे, वादी मागणी करतात त्याप्रमाणे त्यांना दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२४ म्हणून संजय गोपीनाथ साळुंखे यांना सामील करुन घेणेस व दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने योग्य व उचित होईल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

## अंतिम आदेश

१. वादी यांचा हा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांनी अर्जात मागणी केलेप्रमाणे त्यांना दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.२४ म्हणून श्री.संजय गोपीनाथ साळुंखे यांना सामील करुन घेणेस व त्या अनुषंगाने दावा दुरुस्ती करणेस परवानगी देणेत येत आहे.

३. वादी यांनी आजपासून चौदा (१४) दिवसांच्या आत दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करणेची आहे व दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर सादर करणेची आहे.

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2022.03.14 18:48:25 +0530

**दिनांक १४.०३.२०२२** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण विटा.** **तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली.**

Case No : RCS No.601 of 2020
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Typist : D R Kamble
Court Name: 3rd Joint Civil & Criminal Court, Vita, Dist.Sangli.
Date of decision : 14.03.2022
Order signed by P.O.on : 14.03.2022
Order uploaded on : 14.03.2022